आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२८ जून २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- तरुणांना भारतीय परंपरांशी जोडण्यात महान जैन ऋषींचं मोलाचं योगदान असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- ऑपरेशन सिंधु अंतर्गत आतापर्यंत एकंदर ४ हजार ४१५ भारतीय मायदेशी परतले

- बिहार मध्ये आज स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये प्रथमच मोबाइल ॲप च्या माध्यमातून मतदान

- जागतिक एथलेटिक्सच्या क्रमवारीत भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्राला पुन्हा एकदा अव्वल स्थान

**आणि**

- युवा क्रिकेट मधे भारतानं केला इंग्लंडचा ६ गडी राखून पराभव

**<><><><>**

तरुणांना भारतीय परंपरांशी जोडण्यात महान जैन ऋषींचे मोलाचं योगदान आहे, असं मत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्ली इथं आचार्य विद्यानंद जी महाराजांच्या जन्मशताब्दी कार्यक्रमाचं उद्घाटन केल्यानंतर व्यक्त केलं. या प्रसंगी त्यांनी जैन मुनींच्या हस्त लिखीतांचं डीजीटायजेशन करण्याबद्दल माहिती दिली.

**- - बाईट – प्रधानमंत्री ( हस्तलिखीत लिपी ) - -**

वेळी प्रधानमंत्र्यांनी आचार्याजींना आदरांजली अर्पण करण्यासाठी प्रत्येक भारतीय भारतीयांनी अवलंब करावा, अशा 9 संकल्पांविषयी आपलं मत व्यक्त केलं. यात ते म्हणाले की, प्रत्येक भारतीयांनी पाणी वाचवण्यासाठी कटीबद्ध असायला हवं. नैसर्गिक शेती, सुदृढ जीवनशैली, नियमित योग, व्यायाम. जेवणात श्री अन्नाला प्राधान्य, गरिबांना मदत हीच आचार्यांना खरी आदरांजली असेल, असही प्रधानमंत्री म्हणाले. वेळी विशेष स्मारक नाणं आणि टपाल तिकिटाचंही प्रकाशन करण्यात आले. यावेळी विशेष मनोरंजनाच्या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<><><><>**

इस्त्राएल - इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर राबवण्यात आलेल्या ऑपरेशन सिंधु अंतर्गत आतापर्यंत एकंदर ४ हजार ४१५ भारतीयांना मायदेशी परत आणण्यात आलं आहे. यामध्ये इराण मधून ३ हजार ५९७ तर इस्त्राईल मधून ८१८ भारतीयांना विशेष विमानाने भारतात परत आणण्यात आलं. यामध्ये दीड हजारा पेक्षा जास्त महिला आणि ५०० लहान मुलांचा समावेश आहे. या बरोबच १४ ओ सी आय कार्ड धारक, ९ नेपाळी नागरिक, ४ श्रीलंकेचे नागरिक आणि १ इराणी यांचा ही या मध्ये समावेश आहे. दरम्यान, परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी काल इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अरघची यांच्याशी इराणमधल्या परिस्थितीबाबत चर्चा केली. इराणच्या परराष्ट्र मंत्र्याशी झालेली चर्चा फलदायी ठरल्याचं एस जयशंकर यांनी समाजमाध्यमावर प्रसिद्ध केलेल्या संदेशात म्हटलं आहे. भारतीय नागरिकांना मायदेशी सुरक्षित परत आणण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल जयशंकर यांनी सय्यद अरघची यांचे आभार मानले आहेत.

**<><><><>**

इस्त्रायलशी झालेल्या संघर्षात मृत्युमुखी पडलेल्या ६० जणांवर आज इराणमध्ये शासकीय इतमामात अंत्यसंस्कार झाले. इस्लामिक रेव्होल्यूशनरी गार्ड कोरअचे कमांडर, जवान, इस्त्रायलच्या हल्ल्यात ठार झालेले अणुवैज्ञानिक, तसंच सामान्य नागरिकांना आदरांजली वाहण्यासाठी तेहरानच्या आझादी स्ट्रीट इथं हजारो नागरिक जमले होते. आयआरसीजीचे प्रमुख होसेन सालामी यांच्यासह अनेक जण इस्त्रायलनं केलेल्या हल्ल्यात ठार झाले.

**<><><><>**

कोल इंडियाची उपकंपनी महानदी कोलफिल्ड लिमिटेड ओदिशात ३५ दशलक्ष टन संयुक्त क्षमतेच्या दोन नव्या खाणींचं काम सुरू करणार आहे. कंपनीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक उदय कावळे यांनी संबलपूर इथल्या कंपनी मुख्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. २०२५-२६ च्या अखेरपासून सुभद्रा खाणीतून दरवर्षी अडीच कोटी टन कोळशाचं उत्पादन सुरू होईल. बलभद्र खाण २०२९-३० पासून कार्यरत होणार असून त्या खाणीतून वर्षाकाठी १कोटी टन कोळशाची निर्मिती होणं अपेक्षित आहे. या नव्या खाणींमुळे देशातली वाढती कोळशाची मागणी पूर्ण करण्याला तसंच ऊर्जा क्षेत्राला बळ मिळेल, असा विश्वास कावळे यांनी व्यक्त केला.

<><><><>

बिहार मध्ये आज होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये प्रथमच मोबाइल ॲप च्या माध्यमतून नागरिक ई मतदान करणार असून, अशा प्रकारे निवडणुकीत मतदानासाठी मोबाइल ॲपचा वापर करणारे बिहार हे देशातले पहिलेच राज्य ठरले आहे. बिहार मधे ६ नगर पंचायत आणि ३६ नगर पालिकांमध्ये आज निवडणुका होत असून सकाळी ७ ते संध्याकाळी ५ दरम्यान मतदान होत आहे. यामध्ये प्रथमच मोबाइल द्वारे ई मतदान करण्यासाठी ४० हजार नागरिकांनी अर्जाद्वारे  निवडणूक आयोगाकडे नाव नोंदणी केली आहे. बिहारसाठी आजचा दिवस ऐतिहासिक असल्याच राज्य निवडणूक आयुक्त दीपक प्रसाद यांनी म्हंटल आहे. या मोबाइल ॲप द्वारे मतदानाचा हक्क बजावण्याचा फायदा नोकरदार, ज्येष्ठ नागरिक, गरोदर महिला, गंभीर आजाराने ग्रस्त नागरिक आणि दिव्यांग नागरिकांना होईल अस प्रसाद यांनी सांगितल. ई मतदानासाठी पुण्यातील सीडॅक संस्थेने सर्व सुरक्षा व्यवस्था असलेल्या आणि व्ही व्ही पॅट ची सुविधा असलेल्या दोन मोबाइल ॲपच्या यंत्रणा विकसित केल्याचही दीपक प्रसाद यांनी सांगितलं.

<><><><>

मुंबईच्या टाटा मेमोरियल सेंटरमध्ये १७ वर्षीय रुग्णावर रीलॅप्स्ड न्यूरोब्लास्टोमा अर्थात उपचारानंतर पुन्हा उद्भवणाऱ्या मज्जासंस्थेच्या कर्करोगासाठीची देशातली पहिली हाय डोस 131I-mIBG थेरपी यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. या रुग्णाची प्रकृती सध्या चांगली असल्याची माहिती सेंटरनं जारी केलेल्या पत्रकात दिली आहे. रीलॅप्स्ड न्यूरोब्लास्टोमा हा आजार प्रामुख्यानं लहान मुलांना होतो.

<><><><>

जागतिक एथलेटिक्सच्या क्रमवारीत भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्राने पुन्हा एकदा अव्वल स्थान मिळवलं आहे. त्याने ग्रेनेडाच्या एंडरसन पिटर्स ला मागे टाकत दुसऱ्यांदा प्रथम स्थान पटकावलं आहे. गेल्या वर्षी १७ सप्टेंबर ला डायमंंड लीग अतिम सामना जिंकल्यानंतर पिटर्स पहिल्या स्थानावर आला होता. निरजच्या सातत्यपूर्ण यशानंतर तो पुन्हा पहिल्या स्थानी आला आहे. पीटर्स दुसऱ्या तर जर्मनीचा जूलियन वेबर तिसऱ्या तर पाकिस्तानचा यंदाचा ऑलिंपिक सुवर्ण पदक विजेता अर्शद नदीम चौथ्या स्थानावर आहे.

<><><><>

इंग्लंडच्या दौऱ्यावर असलेल्या १९ वर्षाखालील भारतीय क्रिकेट संघानं काल पहिल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात इंग्लंडच्या संघाचा ६ गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना इंग्लडचा डाव १७४ धावांमध्ये आटोपला. रॉकी फ्लिंटॉफनं सर्वाधिक ५६ धावा केल्या. भारतीय गोलंदाज कनिष्क चौहान यानं ३ गडी बाद केले. भारतीय संघानं विजयासाठीचे १७५ धावांचे आव्हान ४ गड्यांच्या मोबदल्यात केवळ २४ षटकात पार केले. वैभव सुर्यवंशीनं १९ चेंडूत ४८ धावांची खेळी केली. अभिज्ञान कुंडूनंही ४५ धावांची खेळी केली. दोन्ही संघांमधला पुढचा सामना येत्या सोमवारी होणार आहे. १९ वर्षांखालील भारतीय क्रिकेट संघ इंग्लंडमध्ये ५ एकदिवसीय आणि २ कसोटी सामने खेळणार आहे.

<><><><>

इंग्लंड आणि भारतीय महिला संघादरम्यान खेळल्या जाणाऱ्या पाच सामन्यांच्या टी -20 आंतरराष्ट्रीय क्रिकेट मालिकेला आजपासून इंग्लंड मधील टेंट ब्रिज नॉटिंगहॅम इथं सुरुवात होत आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी सात वाजता सामन्याला सुरुवात होईल. भारतीय संघानं नुकत्याच श्रीलंकेविरुद्ध झालेल्या एकदिवसीय-तीन सामन्यांच्या मालिकेत उत्तम कामगिरी बजावली आहे.

<><><><>

भारतीय बॅडमिंटनपटू आयुष शेट्टी आणि तन्वी शर्मा युएस खुल्या बॅडमिंटन स्पर्धा २०२५ च्या उपांत्य फेरीत दाखल झाले आहेत. अमेरिकेच्या आयओवा इथं आज महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत तन्वीनं मलेशियाच्या लेतशना करूपथेवन हिला २१-१२,२१-१६ असं पराभूत केलं. तर पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत आयुषनं चीनच्या कुओक्वापन लीन याला २२-२०,२१-९ असं पराभूत केलं.

<><><><>

२०२४-२५ च्या एफआयएच प्रो लीगमध्ये, भारतीय महिला संघ आज बर्लिनमध्ये चीनविरुद्ध सामना खेळेल. सामना सायंकाळी साडेपाच वाजता सुरू होईल.

<><><><>

येत्या २ ते ३ दिवसांत नैर्ऋत्य मान्सून देशभरात पुढे सरकण्यासाठी अनुकूल परिस्थिती असल्याच भारतीय हवामान विभागानं म्हटलं आहे.

**//<><><><>//**